369

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स -II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोनिआ/ ९८२९ /२०२२
दिनांक : १४/१२/२०२२.

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश (पूर्वसूचना)

## महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये प्राथमिक निर्मुलन आदेश .

<u>प्रस्तावना -</u>

(१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद मौजे आकुर्डी येथील स.नं.१७३/३पैकी, सि.स.नं.४६६१/१, पांढारकरनगर झोपडपट्टी या नावाने ओळखले जाणारे क्षेत्र अधिकार अभिलेखानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे भोगवटयात आहे. दि.१३/०१/२०२१ रोजी सदर क्षेत्राची मोजणी झाली आहे व तेथील त्रिमितीय पध्दतीनुसार क्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

i) मोजणी नकाशानुसार एकूण क्षेत्र २१७३.७० चौ.मी.

ii) मालमत्ता पत्रकानुसार एकूण क्षेत्र २१००.०० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे)

(४) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. साई गुरू कन्सट्रक्शन्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे.

(५) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश दि.२४/०५/२०२२ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, जुन २-८, २०२२ मध्ये पृष्ठ क्र. ८-९ तसेच स्थानिक वृत्तपत्र सांज महानगरी व दै. लोकमत मध्ये दि.०२/०६/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे, तसेच प्रत्यक्ष जागेवर दि.०२/०६/२०२२ रोजी डकविण्यात आलेला आहे.

(६) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) दि. १४/०९/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर

मिळकतीवर एकूण १२० झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र १११, अपात्र ०७ व बिगर निवासी पात्र ०१, अपात्र ० व सार्वजनिक ०१ या प्रमाणे एकुण ११२ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत;

(७) सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आले असलेबाबत प्र.सहायक संचालक नगररचना यांनी दि.२३/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सक्षम विभाग क्र.३, झो.पु.प्रा., पुणे यांना कळविले आहे;

(८) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेसंदर्भात मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची अथवा न्यायालयाची स्थगिती नाही म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे;

(९) विकसक मे. साई गुरू कन्सट्रक्शन्स यांचेमार्फत उपरोक्त मिळकतीवर राहणा-या सर्व झोपडीधारकांची तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था आम्ही आमच्या जबाबदारीवर दरमहा भाडे देऊन करणार असलेबाबत रू.५००/- च्या मुंद्रकावरील हमीपत्र या कार्यालयाकडे दि.०७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केले आहे.

त्यामुळे या प्रकरणी उक्त अधिनियमाच्या कलम ३(ड) नुसार आदेश पारित करून सदर क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांनी प्रस्तुत आदेशाद्वारे विनिर्दिष्ट कार्यवाही करावी असे आदेशित करणे आवश्यक असल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**<u>आदेश:-</u>**

१) उक्त अधिनियमाच्या कलम ३ड (अ)(१) मधील तरतूदीन्वये खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रामधील झोपडपट्टीचे निर्मुलन करण्यात यावे असे आदेशीत करण्यात येत आहे.

२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

३) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी.

४) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीमध्ये प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

५) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या

शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

(७) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये सदरचा आदेश कायम करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

**महानगरपालिका क्षेत्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**
**झोपडपट्टीचे नाव - पांढारकरनगर, आकुर्डी स.नं.१७३/३पैकी, सि.स.नं.४६६१/१.**

| स.नं./ सि.स.नं. | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमिती पध्दतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणीनुसार) | योजना क्षेत्राची चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१७३/३पैकी, सि.स.नं. ४६६१/१ पांढारकरनगर, आकुर्डी, पुणे | एम.आय.डी.सी | २१००.०० चौ.मी | लागू रस्ता, स.नं.१७३ पै, सि.स.नं. ४६६१पै. | स.नं.१७३पै, सि.स.नं. ४६६१पै. | स.नं.१७३पै, सि.स.नं. ४६६१पै. | लागू सि.स.नं. ४४८७ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.
स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- १४/१२/२०२२

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- १. मा.जिल्हाधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर.
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.
a) उपआयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.
b) सक्षम प्राधिकारी तथा सहायक आयुक्त, झोनिपु विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.
c) क्षेत्रिय अधिकारी, 'अ' क्षेत्रिय कार्यालय, निगडी, पिंपरी चिंचवड महागनरपालिका, पिंपरी.
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औदयौगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, आण्णासाहेब नगर, चिंचवड, पिपरी चिंचवड, पुणे-१९ यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.